ब) वर कलम अ मधील तरतूदीव्यतिरिक्त कमीत कमी १०% जादा निधी वैधानिक राखीव निधीत, नफा शिल्लक असेल तर भविष्यातील अनपेक्षीत तोट्यांसाठी वर्ग करता येईल.

२) उर्वरित निव्वळ नफ्याची विभागणी खालीलपैकी एका कारणासाठी किंवा सर्व कारणासाठी त्यासाठी केलेल्या नियमावलीनुसार करता येईल.

अ) वार्षिक साधारण सभेने ठरविल्यानुसार व कायदा व नियमानुसार सभासदांना लाभांश देणेसाठी नफ्यातील रक्कम वर्ग करणे.

ब) मागील निवडणूकीच्या खर्चाच्या १/५ रक्कम निवडणूक निधी म्हणून वर्ग करता येईल.

क) संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार शैक्षणिक निधी म्हणून कमीत कमी ५% किंवा जास्तीत जास्त १०% पर्यंत रक्कम संचालक व सेवक यांच्या प्रशिक्षणासाठी शैक्षणिक निधीत वर्ग करता येईल.

ड) रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार गुंतवणूक चढ-उतार निधी करीता आवश्यक ती रक्कम वर्ग करावी.

इ) संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार उर्वरित नफ्याच्या १०% पर्यंत रक्कम तंत्रज्ञान विकास निधी म्हणून वर्ग करता येईल.

फ) शिल्लक राहिलेल्या निव्वळ नफा इमारत निधीस वर्ग करता येईल.

**५६) भाग भांडवल कर्जाशी प्रमाण :**

कर्जदार सभासदांसाठी भाग भांडवलाचे कर्जाशी प्रमाण पुढील प्रमाणात राहील.

१) विनातारणी कर्जासाठी कर्जरक्कमेच्या ५% पर्यंत

२) तारणी कर्जासाठी कर्ज रक्कमेच्या २.५% पर्यंत

३) लघु उद्योग धंद्यासाठी एकूण २.५% पैकी सुरुवातीस कर्ज रक्कमेच्या १% पर्यंत व उर्वरित १.५% पुढील दोन वर्षात घेता येईल. तथापी कोणत्याही सभासदाला बँकेच्या भाग भांडवलाच्या १/५ इतकी रक्कम जास्तीत जास्त घेता येईल.

तथापी रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी यामध्ये बदल केल्यास ते कर्जदारांवर बंधनकारक राहतील.

तसेच भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण १२% पेक्षा जास्त राहिल्यास रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार तारणी कर्जाच्या बाबतीत हे प्रमाण बँक बदलू शकेल.

**५७) निधीची गुंतवणूक :**

बँक निधीची गुंतवणूक खालीलप्रमाणे करु शकेल.

१) सहकारी बँक, राज्य सहकारी बँक, केंद्रीय सहकारी बँक, अन्य कोणीतीही बँक किंवा

२) इंडियन ट्रूस्ट ॲक्टच्या सेक्शन २० मध्ये नमूद केलेल्या कर्ज रोख्यामध्ये किंवा